
Read India
An Imprint of Pratham Books

# नावेतील सहल

हरमिन्दर ओहरी



RGF Pratham
SERIES

Original Story (*English*) The Boat Ride by Herminder Ohri
© Rajiv Gandhi Foundation-Pratham Books, 2004



Second Marathi Edition: 2006


Illustrations: Herminder Ohri
Design: Moonis Ijlal
Marathi Translation: Meera Tendolkar

ISBN: 81-8263-082-7

Registered Office:
PRATHAM BOOKS
9, Charles Campbell Road, Cox Town,
Bangalore 560 005
✆ 080-25801462, 25801463



Regional Offices:
Mumbai ✆ 022-65162526
New Delhi ✆ 011-65684113



Typesetting and Layout by:
Pratham Books

Printed by:
Repro India Ltd., Mumbai


Some rights reserved. This book is CC-BY-3.0 licensed.
Full terms of use and attribution available at:
http://www.prathambooks.org/cc

# नावेतील सहल

लेखन आणि चित्रांकन
हरमिन्दर ओहरी



मराठी रूपांतर
मीरा तेंडोलकर




शहरातील एका छोट्या बागेत पिंपळाचे एक मोठे झाड होते. त्या झाडावर खारींचा एक परिवार राहत होता. विकी त्या परिवारातील अतिशहाणा सदस्य होता. विकीचा चुलतभाऊ काटो, दूर जंगलातून त्याला भेटायला आला आहे.




''आज आपण एका मोठ्या नावेतून फिरायला जाऊया,'' विकीने काटोला सांगितले. काटो घाबरला आणि चाचरत म्हणाला, ''प-प-ण मला पाण्याची भीती वाटते. मला पोहता पण येत नाही.''

''जाऊ दे, भित्रा कुठला ! विकी असताना तुला कसली भीती? मी खूप वेळा नावेतून फिरून आलो आहे,'' फुशारक्या मारत विकी पुढे निघाला.




किनाऱ्याजवळ नाव दोरखंडाने बांधली होती. दोघेही नावेचा दोरखंड सोडवण्यासाठी धावले. नावेत बसून, ते सफरीची मजा लूटत होते.





काही वेळाने नदीतील पाण्यावर हिंदोळे खात झाडांच्या बाजूने हलतडुलत नाव पुढे निघाली. काटोला बदकांची रांग दिसली. तोंडाचा चंबू करून वर डोके काढून मासे, ''हॅलो,'' बोलत होते. हंसांची सुंदर जोडी मान हलवत जवळून गेला.





हंसांना हात लावण्यासाठी काटो खाली वाकला. त्याबरोबर नावेचा धक्का बसून काटो पाण्यात पडला. पडता पडता त्याने काही मासे इथून तिथे जाताना पाहिले. ''वाचवा ! वाचवा !'' पाण्याचे घोट पीत तो ओरडला.


9

विकीला काहीच कळत नव्हते. तो नुसतस इकडून तिकडे पळत होता आणि ओरडत होता. ''अरे, कोणी तरी वाचवा याला. खार पाण्यात बुडत आहे.''

विकीचा आवाज हंसाने ऐकला. आपली लांब मान पाण्यात घालून अलगद चोचीने त्याने काटोला उचलले आणि सावकाश नावेत ठेवले.



थंडीने कुडकुडत काटो उन्हात बसला. विकी त्याच्या शेजारी अगदी गप्प बसला होता. काटोचे केस थोड्या वेळाने सुकले आणि त्याला जरा ऊबदार वाटू लागले तसा तो लगेच म्हणाला, ‘‘किती मजा आली ना ! माझ्या मित्रांनी ऐकले तर त्यांचा विश्वास बसणार नाही.’’

काटोला आपण खूप मोठे हिरो झाल्यासारखे वाटू लागले. जणू काही तो मोठ्या जहाजाचा कॅप्टनच झाला होता.



नाव किनाऱ्यावर लागताच काटोला घरी जायची घाई झाली. कधी एकदा सगळ्यांना भेटतो असे त्याला झाले होते. पण पूर्ण दिवस नावेतून फिरल्यामुळे त्याला सारखी चक्कर येत होती.



जेवायला म्हणून तो खुर्चीवर बसला खरा, पण डोके टेकून तिथेच झोपी गेला.



विकी खार बढाईखोर आहे. एक दिवस त्याला त्याचा चुलतभाऊ भेटायला आला. जेव्हा ते दोघे नावेत बसून फिरायला गेले तेव्हा काहीतरी गमतीशीर घडले. या दोन खारींच्या मजेदार अनुभवाचा हा किस्सा आहे.

*या मालिकेतील इतर पुस्तके*

रडी आणि ठुशी • छुटकू कोळी

मोठे संकट • सुंदर जग

आमच्या वेगवेळ्या भाषेतील शीर्षकांच्या संपूर्ण माहितीसाठी
www.prathambooks.org ला लॉगऑन करा.

प्रथम बुक्स ना-नफा प्रकाशक आहेत जे उत्तम दर्जाची आणि स्वस्त दरात भारतातील विविध भाषेत लहान मुलांसाठी पुस्तके काढतात.

ISBN 81-8263-082-7

9788182630826

Navetil Sahal (Marathi)
Rs. 20.00